# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
## Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½ ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्स:२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


## सहायक मोटार वाहन निरीक्षक पूर्व परीक्षा - २०१७

**क्रमांक : एडीव्ही ३११७/सीआर-८४/२०१६/तीन** **जाहिरात क्रमांक : ०२/२०१७**

शासनाच्या गृह (परिवहन)विभागांतर्गत **मोटार वाहन विभागातील सहायक मोटार वाहन निरीक्षक, गट-क** संवर्गातील एकूण **१८८ पदांवरील** भरतीकरीता आयोगामार्फत **सहायक मोटार वाहन निरीक्षक पूर्व परीक्षा २०१७ रविवार, दिनांक ३० एप्रिल, २०१७** रोजी **मुंबईसह औरंगाबाद, नागपूर व पुणे या** जिल्हाकेंद्रांवर घेण्यात येईल. प्रस्तुत पूर्व परीक्षेच्या निकालाआधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची मुख्य परीक्षा रविवार, दिनांक ०६ ऑगस्ट, २०१७ रोजी किंवा त्यानंतर आयोजित होण्याची शक्यता आहे.

२. प्रस्तुत जाहिरातीत नमूद केलेल्या अटींची पुर्तता करणा-या उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

**३. उपलब्ध पदसंख्या :-**

| **सहायक मोटार वाहन निरीक्षक, गट - क (एकूण १८८ पदे)** | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा.व. | वि.मा.प्र. | एकूण मागासवर्गीय | खुला | एकूण पदे |
| पदसंख्या | २४ | ०७ | ०४ | ०० | ०४ | ०४ | ३६ | ०३ | ८२ | १०६ | १८८ |
| **रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :-** | | | | | | | | | | | |
| (१) सर्वसाधारण | १२ | ०४ | ०२ | ०० | ०२ | ०२ | १८ | ०२ | ४२ | ५३ | ९५ |
| (२) महिला | ७ | ०२ | ०१ | ०० | ०१ | ०१ | ११ | ०१ | २४ | ३२ | ५६ |
| (३) खेळाडू | १ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०२ | ०० | ०३ | ०५ | ०८ |
| (४) माजी सैनिक | ०४ | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०१ | ०५ | ०० | १३ | १६ | २९ |

**३.१** वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे. पदसंख्येत व आरक्षणामध्ये बदल झाल्यास त्याचा समावेश मुख्य परीक्षेच्या अधिसूचनेमध्ये करण्यात येईल.

**३.२** महिलांसाठीचे आरक्षण शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

**३.३** महिलांसाठी आरक्षित पदांकरीता दावा करणा-या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवासी (Domiciled) असल्याबाबत तसेच नॉन क्रीमीलेअर मध्ये मोडत असल्याबाबत (अ.जा. व अ.ज. वगळून) स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे.

**३.४** वि.जा (अ), भ.ज. (ब), भ.ज. (क) व भ.ज. (ड) प्रवर्गासाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदासाठी संबंधित वर्गवारीतील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अद्ययावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध प्रवर्गातील उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

**३.५** प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणासंदर्भात शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १ जुलै, २०१६ तसेच शासन शुध्दीपत्रक क्रमांक:राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १८ ऑगस्ट, २०१६ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**३. ६** प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणाचा दावा करणा-या उमेदवारांनी त्यांची क्रीडा विषयक प्रमाणपत्रे योग्य असल्याबाबत व खेळाडू कोणत्या श्रेणीतील पदांचे आरक्षणासाठी पात्र ठरतो याबाबत आयोगास अर्ज सादर करण्यापूर्वीच सक्षम प्राधिका-याने प्रमाणित केलेले प्रमाणपत्र प्राप्त केलेले असणे आवश्यक आहे.

**३.७** संचालक, क्रीडा किंवा सक्षम प्राधिका-याकडे प्रमाणपत्रे सादर करताना पात्र खेळाडू उमेदवाराने प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणासाठी त्यांना पात्र ठरविणारी आपली खेळाडू विषयक **सर्व प्रमाणपत्रे एकाच वेळी** सादर करणे आवश्यक आहे.

**३.८** क्रीडा प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत व खेळाडू कोणत्या श्रेणीतील पदासाठी पात्र ठरतो याविषयी अर्ज सादर करण्यापूर्वीच्या दिनांकाचे सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले प्रमाणपत्र सादर केल्यास त्यांना पात्र खेळाडू आरक्षणाचा लाभ घेता येईल.

**३.९** शासन निर्णय, गृह (परिवहन) विभाग, क्रमांक:एमव्हीडी-१२०३/प्र.क्र.३७२/परि-४, दिनांक ०८ ऑगस्ट, २००८ नुसार विकलांग उमेदवार सदर पदाकरीता पात्र नाहीत. विकलांग उमेदवारांची पात्रता शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात येणा-या आदेशानुसार राहील.

**३.१०** समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**३.११** परीक्षेच्या कोणत्याही टप्प्यावर मागासवर्गीयासाठी विहित केलेली वयोमर्यादा, शुल्क किंवा इतर पात्रता विषयक अटी/निकषांसंदर्भात कोणतीही सूट/सवलत घेतली असल्यास, अशा उमेदवारांची अमागास (सर्वसाधारण) पदावर शिफारस करण्यात येणार नाही.

**३.१२** अमागास उमेदवारांकरीता विहित केलेल्या वयोमर्यादा, शुल्क तसेच इतर पात्रता विषयक निकषांसदर्भातील अटींची पुर्तता करणा-या सर्व उमेदवारांचा अमागास सर्वसाधारण पदावरील शिफारशींकरीता विचार होत असल्याने सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित/उपलब्ध नसले तरी अर्जामध्ये त्यांच्या आरक्षित प्रवर्गासंदर्भातील माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.

**४. वेतनश्रेणी :-**

**४.१** रूपये ९,३००-३४,८०० (ग्रेड पे- ४,३००) अधिक नियमांनुसार भत्ते.

**५. पात्रता :-**

५.१. भारतीय नागरिकत्व

**५.२ वयोमर्यादा :-**

५.२.१ **दिनांक ०१ मे, २०१७** रोजी वय किमान १९ वर्षे असावे व कमाल ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे.

५.२.२ उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम :-

(१) महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा ५ वर्षांपर्यंत शिथिलक्षम.

(२) प्राविण्य प्राप्त खेळाडूंच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा ५ वर्षांपर्यंत शिथिलक्षम.

(३) माजी सैनिक उमेदवारांच्या बाबतीत वयोमर्यादा शासन शुध्दीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक मासैक-१०१०/प्र.क्र.२७९/१०/१६-अ, दिनांक २० ऑगस्ट, २०१० आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

(४) विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही.

**५.३ शैक्षणिक अर्हता :-**

५.३.१ महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (एस.एस.सी.) किंवा महाराष्ट्र शासनाने एस.एस.सी. च्या समतुल्य म्हणून घोषित केलेली अर्हता, आणि

५.३.२ माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर स्वयंचल अभियांत्रिकी (Automobile Engineering) वा यंत्र अभियांत्रिकी (Mechanical Engineering) विषयातील किमान ३ वर्षाची पदविका वा केंद्र वा राज्य शासनाने त्यास समकक्ष म्हणून घोषित केलेली अर्हता.

५.३.३ स्वयंचल अभियांत्रिकी (Automobile Engineering) वा यंत्र अभियांत्रिकी (Mechanical Engineering) विषयातील मान्यता प्राप्त विदयापीठाची पदवी किंवा त्यापेक्षा उच्च अर्हता धारण केलेले वा केंद्र वा राज्य शासनाने त्यास समकक्ष म्हणून घोषित केलेल्या अर्हता धारण केलेले उमेदवार देखील पात्र राहतील.

५.३.४ शासन पत्र, गृह विभाग, क्रमांक: एमव्हीडी-१२१६/प्र.क्र.-३०१/परि-३, दिनांक २३ जानेवारी, २०१७ नुसार खालील अर्हता समतुल्य शैक्षणिक अर्हता म्हणून स्वीकारार्ह आहेत :-

(१) डिप्लोमा इन प्रॉडक्शन टेक्नॉलॉजी

(२) डिप्लोमा इन प्रॉडक्शन इंजिनिअरिंग

(३) डिप्लोमा इन मशिन टूल्स मेन्टेनन्स

(४) डिप्लोमा इन फॅब्रिकेशन टेक्नॉलॉजी

(५) डिप्लोमा इन फॅब्रिकेशन अँड इरेक्शन इंजिनिअरिंग

(६) डिप्लोमा इन प्लॅन्ट इंजिनिअरिंग

(७) डिप्लोमा इन मेटॅलर्जी

(८) बॅचलर डिग्री इन मेकॅनिकल इंजिनिअरींग

(९) बॅचलर डिग्री इन ॲटोमोबाईल इंजिनिअरींग

(१०) बॅचलर डिग्री इन प्रॉडक्शन इंजिनिअरींग

(११) बॅचलर डिग्री इन इंडस्ट्रिअल इंजिनिअरींग

५.३.५ पदवी परीक्षेस बसलेले उमेदवार प्रस्तुत पूर्व परीक्षेस तात्पुरते पात्र असतील. परंतु सहायक मोटार वाहन निरीक्षक मुख्य परीक्षा-२०१७ च्या प्रवेशासाठी पात्र ठरणा-या उमेदवारांनी सहायक मोटार वाहन निरीक्षक मुख्य परीक्षा-२०१७ करीता अर्ज स्वीकारण्यासाठी विहित केलेल्या अंतिम दिनांकापर्यंत पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

५.३.६ शैक्षणिक अर्हतेसंबंधाने अंतर्वासिता (**Internship**) किंवा कार्यशाळेतील कामाचा अनुभव आवश्यक असेल अशा पदविका/पदवी धारण करणा-या उमेदवारांनी सदर अट मुख्य परीक्षेचा अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत पूर्ण केली असेल तरच त्याला पदवीधर समजण्यात येईल.

५.३.७ मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.

**५.४ अनुभव:-**

५.४.१ स्वयंचल अभियांत्रिकी वा यंत्र अभियांत्रिकी मधील पदविका/पदवी/उच्च अर्हता अथवा वरीलप्रमाणे समकक्ष अर्हता धारण केल्यानंतर मुख्य परीक्षेकरीता अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकास हलकी मोटार वाहने, जड मालवाहू वाहने व जड प्रवासी वाहने यांचे दुरुस्ती व देखभाल करण्याचा पूर्ण वेळ कर्मचारी म्हणून केंद्र अथवा राज्य शासनाच्या विभागामध्ये वा अंगीकृत व्यवसायांचे अखत्यारीतील यंत्रशाळामध्ये घेतलेला अथवा शासन वेळोवेळी निर्देशित करेल अशा संस्थांमध्ये घेतलेला किमान एक वर्ष कालावधीचा अनुभव आवश्यक .

५.४.२ अनुभवाच्या प्रयोजनार्थ प्रशिक्षणार्थी अथवा ॲप्रेंटिस म्हणून वरील ठिकाणी घेतलेला अनुभव गृहित धरला जाऊ शकेल.

५.४.३ मुख्य परीक्षेस अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकास वर नमूद केल्याप्रमाणे किमान एक वर्ष कालावधीचा पूर्ण वेळ कर्मचारी म्हणून अनुभव नसेल त्यांनी नियुक्तीनंतर परिविक्षाधीन कालावधीमध्ये शासनाच्या विभागात अथवा अंगीकृत व्यवसायामध्ये अथवा शासन वेळोवेळी निर्देशित करेल अशा संस्थांमध्ये किमान १ वर्ष कालावधीचा अनुभव घेणे बंधनकारक राहील.

५.५ मुख्य परीक्षेकरीता अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास, गिअर्स असलेली मोटार सायकल, हलके मोटार वाहन आणि परिवहन वाहन (जड मालवाहू वाहन आणि जड प्रवासी वाहन) या संवर्गातील वाहन चालविण्यासाठी सक्षम प्राधिका-याने दिलेली वैध अनुज्ञप्ती (Licence) आवश्यक.

५.६ अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास वर नमूद केलेल्या वाहनांपैकी जड माल वाहतूक वाहन किंवा जड प्रवासी वाहतूक वाहन यापैकी एखादी किंवा दोन्ही वाहने चालविण्याची अनुज्ञप्ती (Licence) नसेल तर अशा उमेदवारास अशी अनुज्ञप्ती, नियुक्ती नंतरच्या दोन वर्षाच्या परिवीक्षा कालावधीमध्ये प्राप्त करणे बंधनकारक असेल.

५.७ परिविक्षा कालावधीमध्ये अशी अनुज्ञप्ती प्राप्त न करणा-या उमेदवारास सेवेतून कमी करण्यात येईल.

५.८ वाहन चालविण्याची अनुज्ञप्ती वेळोवेळी नूतनीकरण केली असली पाहिजे

**५.९ शारीरिक अर्हता :-**

५.९.१ शारीरिक अर्हता खालीलप्रमाणे आवश्यक:-

| पुरुष उमेदवार | महिला उमेदवार |
|---|---|
| (१) **उंची** - १६३ सें. मी. (अनवाणी) (कमीत कमी)<br>(२) **छाती** - किमान ७९ से.मी. (प्रसरणाशिवाय) व किमान ५ से.मी. (प्रसरण) | (१) **उंची** - १५५ सें.मी. (अनवाणी) (कमीत कमी )<br>(२) **वजन** - ४५ कि. ग्रॅ. (कमीत कमी ) |

५.९.२ जे रंगांध नसून, ज्यांची दृष्टी चष्म्यासह वा शिवाय चांगली आहे.

५.१०. मराठी लिहिणे, वाचणे, बोलता येणे अत्यावश्यक आहे.

**६. सेवाप्रवेशोत्तर शर्ती** :-

६.१ वर नमूद केल्याप्रमाणे परिविक्षा कालावधीत नमूद अनुभव व अनुज्ञप्तीच्या अटींची पूर्तता करेपर्यंत सदर उमेदवारास सहायक मोटार वाहन निरीक्षक पदाची कोणतीही कर्तव्य अथवा जबाबदा-या पार पाडता येणार नाही.

६.२ नियुक्त केलेली व्यक्ती दोन वर्षाच्या कालावधीकरीता परिविक्षाधीन असेल, परिविक्षाधीन कालावधी जास्तीत जास्त एका वर्षापर्यंत वाढविता येईल.

६.३ परिविक्षाधीन कालावधीमध्ये विहित केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आणि विहित केलेले प्रशिक्षण (कोणतेही असल्यास) पूर्ण करणे आणि परिविक्षाधीन कालावधी यशस्वीरित्या पूर्ण करणे आवश्यक असेल, जर विहित केलेली विभागीय परीक्षा किंवा प्रशिक्षण किंवा परिविक्षाधीन कालावधी यशस्वीरित्या पूर्ण केला नाही तर ती व्यक्ती सेवा समाप्त करण्यास पात्र राहील.

६.४ परिविक्षाधीन कालावधी यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर किमान पाच वर्ष कालावधीसाठी मोटार वाहन विभागात सेवा करण्याचे बंधपत्र सादर करणे आवश्यक राहील.

६.५ या संबंधात तयार करण्यात आलेल्या नियमानुसार मराठी व हिंदी भाषा परीक्षा अगोदरच उत्तीर्ण झालेली नसेल किंवा त्याला/तिला परीक्षा उत्तीर्ण होण्यातून सूट मिळालेली नसेल तर त्याने/तिने या परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

६.६ महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणी विषयक प्रमाणपत्र धारण करावे लागेल.

६.७ सदर पदावर नियुक्त केलेली व्यक्ती महाराष्ट्र राज्यात कोठेही बदली होण्यास पात्र राहील.

**७. परीक्षेचे टप्पे - दोन**

७.१ प्रस्तुत परीक्षा खालील दोन टप्प्यामध्ये घेण्यात येईल :-

(१) पूर्व परीक्षा - १०० गुण

(२) मुख्य परीक्षा - ३०० गुण

**८. पूर्व परीक्षा शुल्क रुपये : ८.१** :- अमागास - **३७३/-** ८.२ :- मागासवर्गीय :- **२७३/-** **८.३ माजी सैनिक** :- **२३/-**

**९. अर्ज करण्याची पध्दत** :-

९.१ प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील.

९.२ पात्र उमेदवाराला वेब-आधारित (Web-based) ऑनलाईन अर्ज https://mahampsc.mahaonline.gov.in या संकेतस्थळाद्वारे **दिनांक ३० जानेवारी, २०१७ ते दिनांक १९ फेब्रुवारी, २०१७** या कालावधीतच सादर करणे आवश्यक राहील.

९.३ ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या https://mahampsc.mahaonline.gov.in तसेच www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

९.४ आयोगास अर्ज सादर करताना माध्यमिक शालांत प्रमाणपत्रावर असलेल्या नावाप्रमाणेच नावाची नोंदणी करणे व आयोगास अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा, आयोगाच्या सूचनांचे उल्लंघन समजून कारवाई करण्यात येईल.

९.५ आयोगास चुकीची माहिती सादर करणा-या उमेदवारास सदर परीक्षेसाठी व यापुढील सर्व निवडीकरीता अपात्र ठरविण्यात येईल.

९.६ आयोगास अर्ज सादर केल्यानंतर विहित मुदतीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतली जाणार नाही.

९.७ परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरीता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा :-

९.७.१ शुल्क भरण्याकरीता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील " माझे खाते " या लिंक वर क्लिक करावे.

९.७.२ "माझे खाते " या लिंक वर क्लिक केल्यानंतर "माझे अ‍ॅप्लीकेशन" सदरातील 'स्पर्धात्मक परीक्षा' या लिंकवर क्लिक करावे.

९.७.३ 'स्पर्धात्मक परीक्षा' या लिंक वर क्लिक केल्यानंतर अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या/न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. **'Unpaid'** लिहिलेल्या पद/परीक्षेसमोर **'Pay Now'** अशी लिंक उपलब्ध असेल.

९.७.४ " **Pay Now**" या लिंक वर क्लिक केल्यानंतर ३ पर्याय उपलब्ध होतील. (**अ**) ऑनलाईन पेमेंट (**ब**) नागरी सुविधा केंद्र (**क**) चलनाव्दारे

९.७.५ क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन परीक्षा शुल्क अदा करता येईल.

९.७.६ नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो. सदर कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील.

९.७.७ चलनाव्दारे परीक्षा शुल्क भरण्याचा पर्याय निवडल्यास उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

९.७.८ भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरण्याचा पर्याय निवडल्यास अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर केल्यास त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

**९.७.९ विहित पध्दतीने अर्ज सादर करुन ऑनलाईन शुल्क भरण्याची कार्यवाही, तसेच भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही दिनांक १९ फेब्रुवारी, २०१७ रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.**

**९.७.१० चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक २० फेब्रुवारी, २०१७ पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.**

९.७.११ ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर उमेदवाराला त्याच्या प्रोफाईलमध्ये परीक्षा शुल्काचा भरणा झाला आहे किंवा कसे याची स्थिती (status) अवगत होईल. त्याची उमेदवाराने अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वीच तपासणी करुन खात्री करणे अथवा परीक्षा शुल्काचा भरणा झाल्याबाबतची स्थिती उपलब्ध नसल्यास पुन्हा शुल्क भरण्याची अथवा चलन घेण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे. विहित दिनांकानंतर यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

**९.८ केंद्र निवड :-**

९.८.१ परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर उमेदवाराला परीक्षा केंद्राची निवड करणे आवश्यक आहे. त्याकरीता "माझे खाते" मधील संबंधित परीक्षेची निवड करावी. त्यानंतर "केंद्र निवडा" या पर्यायावर क्लिक करावे. सदर पर्यायांतर्गत निवडलेल्या केंद्राची क्षमता दर्शविली जाईल. केंद्राच्या क्षमतेइतक्या अर्ज तत्पूर्वी प्राप्त झाले असतील, तर सदर केंद्र उपलब्ध नसून, दुसरे केंद्र निवडावे, असा संदेश प्राप्त होईल. केंद्राची निवड केल्यानंतर सेव्ह बटनावर क्लिक केल्यास केंद्र निवडीची व अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण होईल.

९.८.२ भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाव्दारे शुल्क भरण्याचा पर्याय निवडलेले उमेदवार शुल्क भरल्याच्या दिनांकाच्या दुस-या दिवशी केंद्र निवडीची प्रक्रिया करु शकतील. दुसरा दिवस कार्यालयीन सुट्टी अथवा रविवारचा असेल, तर सदर कार्यवाही त्यानंतर लगेच येणा-या पुढील कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी करता येईल.

९.८.३ वरीलप्रमाणे केंद्रनिवडीची प्रक्रिया पूर्ण न केल्यास उमेदवाराने अर्जामध्ये दिलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यामधील नमूद जिल्हाकेंद्रावर किंवा नजिकच्या जिल्हाकेंद्रावर प्रवेश देण्यात येईल. याबाबत आयोगाचे त्या त्या वेळचे धोरण व आयोगाचा निर्णय अंतिम मानण्यात येईल.

९.८.४ केंद्र बदलाबाबतची विनंती कोणत्याही परिस्थितीत मान्य करण्यात येणार नाही.

**१०. प्रवेशप्रमाणपत्र :-**

१०.१ प्रस्तुत परीक्षेपूर्वी सर्वसाधारणपणे ७ दिवस अगोदर प्रवेशप्रमाणपत्र उमेदवाराच्या प्रोफाईलदवारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

१०.२ परीक्षेच्या वेळी उमेदवाराने स्वत:चे प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

१०.३ परीक्षेस येतेवेळी स्वत:च्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वत:चे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅन कार्ड किंवा स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसेन्स यापैकी किमान कोणतेही एक मूळ ओळखपत्र व त्याची छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

**११. परीक्षेस प्रवेश**

**११.१ फक्त पेन, पेन्सिल, प्रवेशप्रमाणपत्र, ओळखीचा मूळ पुरावा व त्याची छायांकित प्रत अथवा प्रवेशप्रमाणपत्रावरील सूचनेनुसार आयोगाने परवानगी दिलेल्या साहित्यासह उमेदवाराला परीक्षा कक्षात प्रवेश देण्यात येईल.**

**११.२ डिजीटल डायरी, पेजर, मायक्रोफोन, मोबाईल फोन, कॅमेरा अंतर्भूत असलेली कोणत्याही प्रकारची साधने, सिमकार्ड, ब्लू टूथ, दूरसंचार साधने म्हणून वापरण्या योग्य कोणतीही वस्तू, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, वहया, नोटस, परवानगी नसलेली पुस्तके, बॅग्ज, परिगणक (calculator) इत्यादी प्रकारची साधने / साहित्य परीक्षा केंद्राच्या परिसरात तसेच परीक्षा कक्षात आणण्यास, स्वत:जवळ बाळगण्यास, त्याचा वापर करण्यास अथवा त्याच्या वापरासाठी इतरांची मदत घेण्यास सक्त मनाई आहे. असे साहित्य आणल्यास ते परीक्षा केंद्राबाहेर ठेवण्याची व त्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.**

**११.३ आयोगाने परवानगी नाकारलेले कोणत्याही प्रकारचे अनधिकृत साधन/साहित्य परीक्षेच्यावेळी संबंधित उपकेंद्राच्या मुख्य प्रवेशद्वारावरच ठेवावे लागेल. अशा साधन/साहित्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या नुकसानीस आयोग, जिल्हा प्रशासन किंवा शाळा/महाविद्यालय व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही.**

१२. प्रस्तुत जाहिरातीमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज स्वीकारण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशिलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावरील स्पर्धा परीक्षेअंतर्गत '**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना**' तसेच "**परीक्षा**" विभागातील '**सहायक मोटार वाहन निरीक्षक परीक्षा**' मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती व अधिसूचना अधिकृत समजण्यात येईल.

१३. प्रस्तुत परीक्षेचा सविस्तर अभ्यासक्रम आयोगाच्या **www.mpsc.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

१४. सविस्तर जाहिरात आयोगाच्या www.mpsc.gov.in तसेच https://mahampsc.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

ठिकाण : मुंबई.
दिनांक : ३० जानेवारी, २०१७

सु. ह. अवताडे
अवर सचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

(१) आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.
(२) मुलाखतीच्या वेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्र सादर न केल्यास सदर परीक्षेची उमेदवारी नाकारली जाईल.